सातारा जिल्हा परिषद, ग्रामपंचायत विभाग

दूरवनी क्रमांक ०२१६२/२३३८४३ ईमेल vptzpsatara२@yahoo.in

जा. क्र.ग्रापं/५/कावि/ग्राउभाउ/२०१६, दि.ℓ७ /४/२०१६
३७६६

प्रति,

.............................................

जिल्हा परिषद सातारा.

विषय :-**ग्राम उदय से भारत उदय अभियान (दि.१४ एप्रिल,२०१६ ते दि.२४ एप्रिल, २०१६) तालुका संपर्क अधिकाऱ्यांनी अभियानाचे संनियंत्रण करणेबाबत...**

संदर्भ :- 1) या कार्यालयाचे समक्रमांकाचे पत्र दिनांक ४/४/२०१६.
2) सातारा जिल्हा परिषद, सामान्य प्रशासन विभागाकडील आदेश क्रमांक नियो-2/कावि/40/2015 दिनांक 28 डिसेंबर, 2015.

केंद्र शासनाच्या पंचायत राज मंत्रालयाने, दिनांक १४ एप्रिल, २०१६ (डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती) ते दिनांक २४ एप्रिल,२०१६ (राष्ट्रीय पंचायत राज दिवस) या कालावधीत **"ग्राम उदय से भारत उदय अभियान"** प्रभावीपणे राबविण्यासाठी सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार, सातारा जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींनी ग्राम उदय से भारत उदय अभियान तीन टप्प्यात राबविण्याचे आहे. केंद शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, तिसऱ्या टप्प्यामध्ये दिनांक २१ ते २४ एप्रिल, २०१६ या कालावधीत ग्रामपंचायतींनी ग्रामसभा आयोजित करावयाच्या असून, पूर्वतयारी म्हणून स्वच्छता मोहित हाती घ्यावयाची आहे. याबाबतच्या सविस्तर सूचना संदर्भीय पत्राने गट विकास अधिकारी यांना निर्गमित करण्यात आल्या आहेत.तसेच अभियानाबाबतचा पत्रव्यवहार सातारा जिल्हा परिषदेच्या www.zpsatara.gov.in या वेबसाईटवर देखील **ग्राम उदय से भारत उदय अभियान** या शीर्षकाखाली उपलब्ध करण्यात आला आहे.

आपणास माहिती आहे की, संदर्भ क्रमांक २ चे आदेशानुसार प्रत्येक तालुक्यासाठी संपर्क अधिकारी व नियंत्रण अधिकारी म्हणून खातेप्रमुखांच्या नियुक्ती करण्यात आल्या आहेत.

| अ.क्र. | तालुका | संपर्क अधिकारी | नियंत्रण अधिकारी |
|---|---|---|---|
| 1 | पाटण | महिला व बाल विकास अधिकारी , जि.प.सातारा | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा |
| 2 | कराड | जिल्हा आरोग्य अधिकारी | |
| 3 | सातारा | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.), जि.प.सातारा | |
| 4 | माण | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता), जि.प.सातारा | |
| 5 | खटाव | कृषि विकास अधिकारी, जि.प.सातारा | |
| 6 | कोरेगाव | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं), जि.प.सातारा | |
| 7 | जावली | मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प.सातारा | प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सातारा |
| 8 | महाबळेश्वर | कार्यकारी अभियंता, बांधकाम (दक्षिण) विभाग, जि.प.सातारा | |
| 9 | वाई | जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जि.प.सातारा | |
| 10 | खंडाळा | कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जि.प.सातारा | |
| 11 | फलटण | शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प.सातारा | |

संपर्क अधिकारी व नियंत्रण अधिकारी यांनी त्यांना नेमून दिलेल्या तालुक्यांमध्ये दिनांक १४ ते २४ एप्रिल, २०१६ या अभियान काळात वेळोवेळी ग्रामपंचायतींना भेटी देवून अभियानाची योग्यरितीने अंमलबजावणी सुरु असल्याबाबतची सुनिश्चिती करावयाची आहे.

अभियानाच्या पूर्वी तालुकास्तरावर संबंधित अधिकाऱ्यांसोबत सल्लामसलत करुन अभियानाची पूर्वयारी करावी. ग्रामपंचायत स्तरावरील अभियानातील तीनही टप्यातील विविध कार्यक्रमांना उपस्थिती दर्शवावी. जास्तीत जास्त ग्रामसभांना उपस्थित राहून शासनाच्या विविध योजनांची माहिती ग्रामसभेत द्यावी.

आपण करीत असलेल्या कार्यवाहीचा अहवाल व छायाचित्रे वेळोवेळी ग्रामपंचायत विभागाकडे soft copy मध्ये vptzpsatara2@yahoo.in या ईमेलवर पाठवावा. तसेच खातेप्रमुखांच्या साप्ताहिक आढावा बैठकीमध्ये अवगत करावे.

मुख्य कार्यकारी अधिकारी,
**जिल्हा परिषद सातारा.**

प्रत – गट विकास अधिकारी, पंचायत समिती ...( सर्व)